महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसुचना/ ९६२ /२०२३ दि. ०९ /१०/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** भिवंडी वाहतूक उप विभागात दि. १५/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ या कालावधीत नवरात्रोत्सव व दसरा सण साजरा करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम.व्हि.ए.–११६/सीआर/३७/टिआर, दि.२७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे वाहतूक अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) कारीवली, हनुमान मंदिर जवळ विटभट्टी, सुतारआळी नाका या भागातुन मंडई कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **सुतारआळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सुतारआळी, इदगाहरोड अथवा दर्गाहरोड मार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कॉटरगेट जकात नाका येथून मंडई, बाजारपेठ व तिनबत्ती कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **हनुमानबावडी मिरॅकल मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कॉटरगेट मस्जिद येथून जैतुनपुरा भिवंडी शहर पो.स्टे. कडून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) धामणकर नाक्याकडुन जुना ठाणा रोडने मंडईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **केशरबाग नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने केशरबाग नाका येथून उजवीकडे वळून कुंभारआळी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) (अ) मुंबई ठाणे बाजु कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड वाहने वसई रोड मार्गाने कारीवली जकात नाका व विटभट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) (ब) टी.एम.टी./एस.टी.बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो.स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टी.एम.टी./एस.टी.चे प्रवासी नारपोली पो.स्टे. या ठिकाणी उतरतील व तेथुनच प्रवासी घेवून परत जातील आणि हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५)(अ) रांजनोली नाका बाजू कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम व हलकी वाहने त्यात कार, रिक्षा, दुचाकी वाहने यांना **रांजणोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड, मध्यम व हलकी वाहने रांजणोली नाका येथून वळसा घेवून मुंबई–नाशिक बायपास हायवे वरून माणकोली नाका येथून अंजूरफाटा किंवा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथून ओवळी गांव, ताडाळी जकातनाका किंवा पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) (ब) एस.टी./के.डी.एम.टी. बसेस यांना **रांजणोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** एस.टी./के.डी.एम.टी बसेस रांजणोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरून इच्छित स्थळी जातील व इतर वाहने रांजणोली नाका येथूनच वळसा घेवुन परत जातील.

**प्रवेश बंद –** ६)(अ) वाडा रोडमार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना अंबाडी नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने अंबाडी नाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद –** ६)(ब) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना पारोळफाटा (नदीनाका) येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग –** सदरची हलकी वाहने पारोळ फाटा येथून उजवे वळण घेवून खोणी गाव, तळवली फाटा, कांबारोड या पर्यायी मार्गाने वसई रोड येथून डावे वळण घेवून कारीवली मार्गे इच्छित स्थळी जातील अथवा विश्वभारती फाटा येथून डावीकडे वळून गोरसई गावमार्गे इच्छित स्थळी जातील

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | ७) मुंबई ठाणे बाजू कडून जुना आग्रारोडने गोल्डन डाईज येथून कशेळी मार्गे नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अंजुर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने जुना आग्रा रोडने न जाता त्यांनी माणकोली मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ हायवे बायपास मार्गाचा वापर करून नाशिककडे जातील. |
| **प्रवेश बंद –** | ८) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस.टी.बसेससह धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | (अ) सदरची वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील.<br>(ब) तसेच एस.टी. बसेस या आपले प्रवासी चाविंद्रा जकात नाका या ठिकाणी उतरवतील व तेथूनच प्रवाशी घेवून बस वळवून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –<br>व<br>नो पार्किंग** | ९) दि. २४/१०/२०२३ रांजनोली नाका ते कल्याण नाका, अंजुरफाटा ते धामणकर नाका, वंजारपट्टी नाका ते नदीनाका, टावरे कंम्पाऊंड, दुधबावडी नाका, दर्गारोड, केशरबाग नाका, मंडई, तिनबत्ती, बाजारपेठ, झेंडानाका, टिळक चौक, शिवाजी पथ, हाफीजीबाबा दर्गा, धामणकर नाका ते वऱ्हाळदेवी तलाव, या विसर्जन/मिरवणुकीच्या मार्गावर रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतेही वाहन उभे करण्यास **सक्त मनाई** करण्यात येत आहे. तसेच सर्व प्रकारची वाहने (दुर्गादेवी मुर्ती घेवून जाणारे वाहनांखेरीज करुन) टांगे, हातगाडया यांना सुध्दा सदर मार्गावर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

सदरची वाहतूक अधिसूचना दुर्गादेवी विसर्जनाच्या दिवशी म्हणजे दि. २४/१०/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. पासून ते दुर्गादेवी विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व दुर्गादेवी मुर्ती विसर्जनातील वाहनांना लागु होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मा. आयुक्त, बृहन्मुंबई, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण.
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.भिवंडी–निजामपूर शहर संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.